http://lokadesh.in

# लोकादेश

मूल्य १ रु.

महाराष्ट्र शासन जाहिरात मान्यताप्राप्त साप्ताहिक

मुख्य संपादक : साजीद बडगुजर

किनवट, वर्षे १७ वे, अंक २६ वा, सोमवार, दि.१७ जून २०२४, पाने ०४

RNI No. MAHMAR/2007/20732

Post Regd.NO G-2/RNP/NND-323/2023-2025

# जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांनी सेतू सुविधा केंद्रात अर्ज करून मिळवावी विनामूल्य रेती

## प्रशासनाकडून वाळू डेपोवर रेतीसाठा आरक्षित

**नांदेड दि. १४ : केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांमधून ज्यांना घरकुल मिळाले आहेत अशा लाभार्थ्यांसाठी जिल्हा प्रशासनाने मोफत रेतीसाठा उपलब्ध केला आहे. शासन निर्णयानुसार सेतू केंद्रात अर्ज करून घरकुल लाभार्थी मोफत रेतीसाठा घरासाठी मिळवू शकणार आहे.**



शासन निर्णयानुसार जिल्ह्यात घरकुलाच्या लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. आतापर्यंत नांदेड जिल्ह्यात ३ हजार ६६२ लाभार्थ्यांसाठी एकूण १७ हजार ३७२ ब्रास रेतीसाठा वितरित करण्यात आला आहे. अशा विनामुल्य वाळु उपलब्ध करुन दिलेल्याय घरकुलाच्या लाभार्थ्यांची यादी जिल्हा प्रशासनाना www.nanded.nic.in डब्ल्यू डब्ल्यू डॉट नांदेड डॉट एनआयसी डॉट इन या वेबसाईटवर जाहीर केली आहे.

घरकुलाच्या विविध योजनातून ज्यांना शासकीय घर मंजूर करण्यात आले आहे. अशा मंजुर घरकुल लाभार्थीची माहिती महाखनिज प्रणाली या वेबसाईटवर नोंदविण्यात आली आहे. या यादीमध्ये नोंद असलेल्या लाभार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वनविभागाच्या १९ एप्रिल २०२३ व १६ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयान्वये बांधकाम करण्यास मोफत रेती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

तसेच जिल्हा प्रशासनाने वाळु डेपोमध्ये वाळू डेपोनिहाय रेतीसाठा आरक्षित केला आहे याची माहिती सुध्दा www.nanded.nic.in या वेबसाईटवर जाहीर केली आहे. जिल्ह्यामध्ये आता घरकुल लाभार्थ्यांसाठी एकूण १८,६३३ ब्रस रेती आरक्षित करण्यात आली आहे. यामध्ये देगलूर उपविभागात देगलूर तालुक्यात शेवाळा येथे ४४४, तमलूर येथे ३३० तर शेखापूर येथे ३९३ ब्रस रेसीसाठा उपलब्ध आहे. बिलोली उपविभागात येसगी १९९९, नागणी ४८९, सगरोळी - १ येथे १८३९, सगरोळी -२ येथे ४८९१ तर हुनगुंदा १२६०, गंजगाव ६३०, बोळेगाव २४ ब्रस साठा राखीव आहे. उपविभाग हदगाव बेलमंडल या डेपोमध्ये ४९२, उपविभाग किनवट माहूर तालुक्यामध्ये केरोळी ८३९, कोळी बे. ६४५ तर धर्माबाद उपविभागात बळेगाव ६९३ रेतीसाठा उपलब्ध आहे. कंधार उपविभागात येळी १२६, बेटसावंगी १२९२ साठा उपलब्ध आहे. नांदेड उपविभागात खुपसरवाडी १४८२, भायेगाव १७२, वाघी ५८५ ब्रस रेतीसाठा आरक्षित आहे.

अत्यंत सोप्या पद्धतीने ही रेती लाभार्थ्यांना मिळणार आहे त्यासाठी फक्त वाळूची आवश्यकता असणा-या घरकुल लाभार्थ्यांनी नजीकच्या सेतू केंद्रात जाऊन संपर्क करावा. ऑनलाईन अर्जाची प्रक्रिया पूर्ण करून विनामूल्य वाळू उपलब्ध करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

# राज्य विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन २७ जून पासून मुंबईत

मुंबई, ता. १४ :- राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन मुंबई येथे गुरुवार, २७ जून ते शुक्रवार, १२ जुलै २०२४ या कालावधीत होणार आहे. राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प २८ जून रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात येणार आहे.विधानभवन मुंबई येथे विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली.



या वेळी अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीला विधानसभा अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गो-हे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे) यांच्यासह कामकाज सल्लागार समितीचे सदस्य, विधिमंडळ सचिव जितेंद्र भोळे आदी मान्यवर उपस्थित होते. पावसाळी अधिवेशन २७ जून ते शुक्रवार, १२ जुलै २०२४ या कालावधीत होणार असून, एकूण तेरा दिवस कामकाज चालणार आहे. शनिवार २९ जून २०२४ सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज सुरू राहील, असे या बैठकीत ठरविण्यात आले.

# विदर्भ-मराठवाड्यातील ९५ गावांना विस्थापित करणा-या चिमटा धरणाच्या कामाला वेग



**लोकादेश न्यूज, माहूर : विदर्भ-मराठवाड्यातील ९५ गावांना विस्थापित करणा-या चिमटा धरणाला दोन्ही बाजूच्या शेतक-यांचा प्रचंड विरोध आहे. अशा स्थितीत मागील दोन दिवसांपूर्वी सदर धरणाच्या कामाला वेगाने सुरूकरण्यासाठी सबंधीत यंत्रणेने आधुनिक यंत्र सामग्री किनवट तालुक्यातील खंबाळा येथे धरण स्थळी आणली आहे. त्यामुळे बुडीत क्षेत्रात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

निम्न पैनगंगा चिमटा धरण नको, अशी भूमिका मागील अनेक वर्षांपासून धरणविरोधी संघर्ष समितीने घेतल्याने धरण विरोधक शेतक-यांच्या रोषाला सामोरे गेलेल्या पाटबंधारे विभागाच्या काही अधिकारी वर्गाची यापूर्वी १२ जुलै २००७ साली संतप्त शेतक-यांनी धिंड काढली होती. याच पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या प्रकल्पाच्या कामाचा अट्टाहासामुळे बुडीत क्षेत्रातील गावात वातावरण तापले आहे. लोकसभा निवडणुकी दरम्यान आश्वासनाप्रमाणे बैठक लावण्याची मागणी धरण विरोधी संघर्ष समितीचे मुबारक तंवर, प्रल्हाद गावंडे, अॅड. बालाजी येरावार, बंडूसिंग नाईक, डॉ. बाबाराव डाखोरे, गुलाब मेश्राम, नीलेश कुमरे, बंटी जोमदे, बाबू फारुकी, विजय पाझारे, राज गावंडे यांनी केली आहे.

महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या सीमेवर नांदेड व यवतमाळ जिल्ह्याच्या मध्यभागी प्रस्तावित निम्न पैनगंगा प्रकल्प (चिमटा धरण) च्या मुख्य भितीचे काम तीन महिन्या पूर्वी एप्रिल मध्ये सुरू झाले होते. तेव्हा या कामाला पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीने एल्गार पुकारात हजारो शेतक्यांच्या उपस्थितीत दि. ६ मे रोजी आंदोलन केले होते. लोकसभा निवडणुकीतील आचार संहिता सुरूअसल्याने पोलिसांनी मध्यस्ती करत पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची समजूत काढल्याने आता आचार संहिता असे पर्यंत निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम बंद राहणार असा तात्पुरता तोडगा काढला होता. मात्र आचार संहिता संपताच पुन्हा धरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. मागील २-३ दिवसापूर्वी आधुनिक यंत्र सामुग्री दाखल झाल्याने बुडीत क्षेत्रातील गावात प्रचंड खळबळ माजली असून वातावरण प्रचंड तापले आहे.

# घरी लागणार नाही आता 'स्मार्ट मीटर'!

## जनआक्रोशाची दखल : लहान व्यावसायिकांनाही वगळले



मुंबई : मागील काही दिवसांपासून विजेच्या स्मार्ट मीटरविरोधात सुरू असलेल्या जनआक्रोशाची दखल राज्य सरकारने घेतली आहे. घरगुती वापरासाठी स्मार्ट मीटर लागू केले जाणार नाहीत, त्यासाठी पूर्वीचीच पद्धत कायम राहील, असे उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी जाहीर केले.

मुंबईत शुक्रवारी भाजपच्या महत्त्वाच्या पदाधिका-यांची बैठक झाली. त्यात फडणवीस यांनी सामान्य वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर लावण्यात येणार नाही, असे स्पष्ट केल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बैठकीनंतर पत्रकारांना दिली. त्यामुळे आता घरगुती आणि लहान व्यावसायिकांसाठी स्मार्ट मीटर न लावता ते केवळ औद्योगिक आणि मोठ्या वीज ग्राहकांसाठी ते लावले जातील असे स्पष्ट झाले.

**२.१६ कोटी**

**सर्वसामान्य ग्राहकांकडे बसविणार होते स्मार्ट वीज मीटर**

**२५.६ लाख**

**औद्योगिक व मोठ्या ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसविणार.**

**४ कंपन्यांना दिले होते कंत्राट**

स्मार्ट मीटरचे कंत्राट अदानी पॉवर, जीनस कंपनी, एनसीसी कंपनी, मॉन्टेकार्लो या कंपन्यांना देण्यात आले होते.

येत्या आठवड्यापासून ते बसविण्यास सुरुवात होणार होती.

आता मात्र फडणवीस यांच्या घोषणेमुळे सामान्य वीज ग्राहकांकरीता स्मार्ट मीटर आणली जाणार नाहीत, हेही स्पष्ट झाले आहे.

**मीटरवरून दावे-प्रतिदावे**

१. लोकसभा निवडणुकीच्या आधीच स्मार्ट मीटरविरोधात नाराजीच सूर उमटले होते. वीजग्राहक आणि वीज कर्मचा-यांमध्येही त्याबाबत रोष होता. या मीटरमुळे विजेचे बिल अधिक येईल, असा काहींचा दावा होता.

२. स्मार्ट मीटर हे प्रीपेड स्वरुपाचे आहे. त्यामुळे वीज चोरी, चुकीचे मीटर रिडिंग करून अवाजवी बिले दिली जाणे याला आळा बसेल, असे महावितरणचे म्हणणे होते.

३. सध्याच्या पद्धतीत वीज कर्मचारी रिडिंग घ्यायचे वीज बिलांचे वाटप करायचे. त्यामुळे कर्मचा-यांच्या नोक-यांवर स्मार्टमीटरमुळे गदा येईल, असे कर्मचारी संघटनांचे म्हणणे होते.

# नांदेडमधील कौठा गावात सशस्त्र दरोडा दागिन्यांसह ६० लाख रुपयाची लूट

**नांदेड : कौठा गावातील कृषी सेवा केंद्रचालकाच्या घरावर पाच सशस्त्र दरोडेखोरांनी दरोडा टाकला. या दरोड्यात ३५ तोळे सोने व २२ लाखांची रोकड असा ६० लाख रुपयांचा ऐवज लुटून दरोडेखोरांची टोळी चारचाकी वाहनातून पसार झाली. ही घटना शनिवारी (दि. १५) पहाटे तीनच्या सुमारास घडली. या घटनेनंतर कौठा गावासह परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.**





कंधार तालुक्यातील कौठा येथे मुख्य रस्त्यावर गजानन श्रीहरी येरावार यांचे कृषी सेवा केंद्र आहे. दुकानाच्या वर त्यांचे घर आहे. येरावार पती, पत्नी व त्यांच्या आई हे सर्व गाढ झोपेत होते. तोंडाला मास्क लावून आलेले पाच दरोडेखोर लोखंडी गेट तोडून घरात घुसले. येरावार यांना शस्त्रांचा धाक दाखवून तिजोरीची चावी मागितली. चावी न दिल्याने येरावार यांना दरोडेखोरांनी जबर मारहाण केली. त्यानंतर चावी देताच तिजोरीतील ३५ तोळे सोन्याच्या दागिन्यांसह रोख २२ लाख रुपये घेऊन पसार झाल्याचे सांगण्यात आले. गुन्हा दाखल झाल्यानंतरच नेमकी किती रोकड व सोने लुटले गेले. या घटनेची माहिती समजताच जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, उपअधिक्षक खंडेराय धरणे, उपविभागीय अधिकारी संकेत गोसावी, पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव आणि स्थानिक गुन्हे शाखेसह कंधार पोलीसांच्या पथकाने घटनास्थळी भेट देवून पाहणी केली.

# पाचवी ते दहावीच्या मुलींसाठी तीन हजारांपर्यंत शिष्यवृत्ती!

## राज्य शासनाची सावित्रीबाई फुले मॅट्रीकपूर्वी शिष्यवृत्ती योजना!

**नांदेड : शाळेतील मुलींच्या गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी राज्य शासनाने सावित्रीबाई फुले मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरु केली असून, या योजनेअंतर्गत विद्यार्थिनींना ६०० रुपयांपासून ते ३ हजार रुपयांपर्यंतची शिष्यवृत्ती दिली जाते.**




राज्यातील आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबातील मुलींचे जीवनमान सुधारण्यासाठी राज्य शासनाने कडून विविध योजना राबल्या जातात. विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील मुलींच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. राज्यातील अनेक कुटुंब दारिद्रयरेषेखाली स्वतःचे जीवन जगत आहेत. त्यांच्याजवळ उत्पन्नाचे स्थायीसाधन नसल्याने त्यांची आर्थिक स्थिती हलाखीची असते. परिणामी मुलींना योग्य शिक्षण सुद्धा देता येत नाही. अशा गरीब परिवारातील मुली शिक्षण पूर्ण करण्यापासून वंचित राहतात. अशा मुलींच्या शिक्षणासाठी शासनाने सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. पाचवी ते दहावीतील मुलींना ही शिष्यवृत्ती प्रदान केली जाते.

**काय आहे सावित्रीबाई फुले मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना?**

१. जमाती व विशेष भागस प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या गरीब असणा-या कुटुंबातील मुलींना शिक्षण पूर्ण करता यावे, या उद्देजशाने सावित्रीबाई फुले मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे.

२. रुपयांपासून ते ३००० रुपयांपर्यंतची शिष्यवृत्ती दिली जाते. मुलींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे, हा देखील ही शिष्यवृत्ती सुरु करण्यामागचा प्रमुख उद्देश आहे. समाज कल्याण विभागामार्फत ही योजना राबविली जाते.

३. ६०० ते १ हजार रुपयांपर्यंत शिष्यवृत्ती पाचवी ते सावती वर्गात शिकणा-या विद्यार्थिनीस दरमहा ६० रुपये या प्रमाणे १० महिन्यांसाठी ६०० रुपये शिष्यवृत्ती रक्कम दिली जाते. आठवी ते दहवी वर्गात शिक्षण घेणा-या अनुसूचित जातीच्या विद्यार्थिनीस शक्षणिक वर्षात जून ते मार्च असे दहा महिने १०० रुपये प्रमाणे शिष्यवृत्ती दिली जाते.

**निकष काय?**

विद्यार्थिनी पाचवी ते दहावी वर्गात शिक्षण घेणारी असावी. अर्जदार विद्यार्थिनीने केंद्र किंवा राज्य शासनाद्वारे सुरु असलेल्या अन्य योजनेचा लाभ मिळत असेल तर या योजनेचा लाभ दिला जाणार नाही. विद्यार्थिनी विजाभज/विमाप्र या प्रवर्गातील असावी.

**कागदपत्रे काय लागतात?**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड, पालकांचे रेशन कार्ड, रहिवासी दाखला, ई-मेल आयडी, मोबाइल नंबर, पासपोर्ट आकाराचे फोटो, विद्यार्थिनीचे मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक आदी कागदपत्र लागतात.

**अर्ज कधी व कोठे करायचा?**

अर्जदाराला सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागात अर्ज करावा लागेल. अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडावी लागतात. आहे. या अंतर्गत विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थिना लाभ मिळतो. जास्तीत जास्त विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण अधिका-यांकडून करण्यात आले आहे. ५००० पेक्षा अधिक लाभार्थी जिल्ह्यात या योजनेअंतर्गत पाच हजार पेक्षा अधिक विद्यार्थिनींना लाभ दिला जात आहे. योजनेमुळे मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून आले आहे.

# छत्तीसगढच्या अबुझमाडमध्ये चकमक

## आठ नक्षलवादी ठार, एक जवान शहीद



**गडचिरोली : जिल्ह्याला लागून असलेल्या छत्तीसगडमधील नारायणपूरच्या अबुझमाड जंगलात झालेल्या पोलीस-नक्षलवादी चकमकीत आठ नक्षलवादी ठार झाले, तर एक जवान शहीद आणि २ जखमी झाले. ठार झालेल्या नक्षलवाद्यांवर एकूण ३८ लाखांचे बक्षीस होते.**

छत्तीसगड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या दोन दिवसांपासून नारायणपूर, कांकेर, दंतेवाडा आणि कोंडागाव या चार जिल्ह्यांतील जिल्हा राखीव दल, स्पेशल टास्क फोर्स आणि इंडो-तिबेट बॉर्डर पोलीस जवानांचे संयुक्त पथक अबुझमाड परिसरातील कुतुल, फरसाबेदा, कोडामेटा जंगलात नक्षलविरोधी मोहिमेवर होते. शनिवारी सकाळी जंगलात लपून असलेल्या नक्षलवाद्यांनी पोलिसांच्या दिशेने गोळीबार केला. या वेळी झालेल्या चकमकीत आठ नक्षलवादी ठार झाले, तर एक जवान शहीद झाला. चकमकस्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा देखील जप्त करण्यात आला.

अबुझमाड हा नारायणपूर, बिजापूर आणि दंतेवाडा जिल्ह्यांमध्ये येणारा डोंगराळ, जंगली भाग आहे. गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेला लागून असलेला हा परिसर भौगोलिकदृष्ट्या अलिप्त आणि अतिदुर्गम असून नक्षलवादी कारवायांचा केंद्रबिंदू मानला जातो.

**वर्षभरात १३५ हून अधिक नक्षलवादी ठार**

**यापूर्वी ७ जून रोजी नारायणपूर-दंतेवाडा येथे नक्षलवादी आणि डीआरजी जवानांमध्ये चकमक झाली होती. ज्यामध्ये सात नक्षलवादी ठार तर तीन जवान जखमी झाले होते. छत्तीसगड सरकारच्या आकडेवारीनुसार, वर्षभरात १३६ नक्षलवादी मारले गेले व ५०३ जणांना अटक करण्यात आली. ४३७ जणांनी आत्मसमर्पण केले.**

# उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

नांदेड दि. १५ :- राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना' शासन निर्णय १३ डिसेंबर २०२३ नुसार लागु करण्यात आली आहे.

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना' हे तातडीने अंमलबजावणी करावी, त्यामध्ये इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यानी या योजनेचा अर्ज करावा, असा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. इयत्ता १२ वी नंतरच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या व्यावसाईक व बिगर व्यावसाईक अभ्यासक्रमास प्रथम वर्षात, व्दितीय वर्षात, तृतीय वर्षात व चतुर्थ वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांनी या योजनेचा अर्ज करावा. या योजनेचा अर्ज हा सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण नांदेड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जाती प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयाचे वरील बाजुस नांदेड या ठिकाणी संपर्क साधुन विनामुल्य अर्ज प्राप्त करुन घेऊन सदरचे अर्ज व्दितीय, तृतीय वर्षात व चतुर्थ वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांनी १५ जुलै २०२४ पुर्वी या कार्यालयात सादर करावेत, व प्रथम वर्षात प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांनी २० ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक शिवानंद मिनगीरे यांनी केले आह

एकविसावे शतक हे स्पर्धात्मक युग असून त्यामध्ये इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्याना टिकून राहणे, इतर प्रवर्गातील विद्यार्थ्याशी स्पर्धा करणे तसेच आवश्यक ते कौशल्य व गुणवत्ता धारण करणे, विद्यार्थी / विद्यार्थीनिंना आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया विविध क्षेत्रात स्पर्धला तोंड देता यावे आणि शैक्षणिकदृष्टया उन्नती होणे आवश्यक आहे. वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक खर्चासाठी अनुदान देणे या दृष्टीकोणातून उच्च शिक्षण घेण्याऱ्या मुला-मुलींसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना' ची अमलबजावणी करणे बाबत निर्देशित करण्यात आले आहे.

# ईद-उल-अजहा



इस्लाम धर्मातील महत्वाच्या सणांमध्ये प्रामुख्याने बकरी ईदचा समावेश होतो. बकरी ईदलाच 'बकरीद ईद' किंवा 'ईद-उल-अजहा' असे म्हटले जाते. बकरी ईद त्याग आणि समर्पणाचा सण समजला जातो. हा सण इस्लामिक कॅलेंडरनुसार शेवटच्या महिन्यात म्हणजेच जु-उल-हज्जामध्ये साजरा केला जातो. येत्या १७ जून २०२४ रोजी देशभरात मुस्लिम बांधवांमार्फत बकरी ईदचा सण साजरा होत आहे.

इस्लाम धर्मामध्ये पैगंबर हजरत इब्राहिम यांना अल्लाहचे प्रेषित मानले जाते. त्यांना इस्लाममध्ये प्रचंड महत्व आहे. इस्लामिक मान्यतेनुसार, एके दिवशी अल्लाहने पै.हजरत इब्राहिम यांची परीक्षा घेण्याचे ठरवले. त्यानुसार अल्लाहने त्यांना आपल्या मुलाची कुर्बानी देऊन समर्पित करायचा आदेश दिला. अल्लाहच्या या आदेशाने ते पेचात सापडले. कारण एकीकडे अल्लाहचा हुकूम आणि दुसरीकडे आपल्या प्राणापेक्षा प्रिय आपला मुलगा. शेवटी हजरत इब्राहिम यांनी आपल्या मुलाची कुर्बानी देण्याचा निर्णय घेतला. त्यांना ते डोळ्यांनी पाहणे शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांनी आपल्या डोळ्यावर पट्टी बांधून कठोर मनाने कुर्बानी दिली. मात्र ज्यावेळी त्यांनी डोळे उघडले तेव्हा त्यांचा मुलगा त्यांच्यासमोर धडधाकट उभा होता. आणि मुलाच्या जागी एक बक-याची कुर्बानी झाली होती. हा चमत्कारसुद्धा अल्लाहनेच केला होता. या मान्यतेनुसार बकरी ईदला बक-याची कुर्बानी देण्याची प्रथा सुरू झाली.

मुस्लिम बांधव ईदच्या दिवशी एकत्र येऊन सामूहिक नमाज पठण करून आपला सण साजरा करतात. त्यानंतर शीर खुरमा आणि बिर्याणीवर ताव देतात. मात्र बरेच लोक कामानिमित्त बाहेर असतात किंवा ज्यांना एकत्र येणे शक्य नसते, अशावेळी हे लोक सोशल मीडियाच्या माध्यमातून एकमेकांना शुभेच्छा देऊन आपला सण साजरा करतात.

आपल्या देशामध्ये विविध जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहतात. प्रत्येक धर्मानुसार विविध चालीरीती आणि परंपरा पाहायला मिळतात. प्रत्येकालाच आपल्या धर्माबद्दल आदर आणि प्रेम असते. तर अनेकांना विविध धर्माबाबत जाणून घेण्याचे कुतूहल असते. प्रत्येक धर्मात काही ना काही महत्व आणि रहस्ये असतात. यातीलच एक धर्म म्हणजे इस्लाम होय. इस्लाम धर्मामध्ये विविध रिती-परंपरा पाहायला मिळतात. या धर्मात प्रत्येक गोष्टीमागे एक महत्व असते.

इस्लाम धर्मात हज आणि उमराह या यात्रांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. आपल्या आयुष्यात एकदा तरी या पवित्र ठिकाणी भेट द्यावी अशी मुस्लिम बांधवांची इच्छा असते. अनेक लोक आयुष्यभराची मिळकत ठेऊन या पवित्र ठिकाणी जाऊन मनोभावाने आपल्या धर्माची प्रार्थना करतात. ईद-उल-अजहा निमित्त सर्व देशवासीयांना ईद च्या हार्दिक शुभेच्छा !

# कृषी विभागाच्या कल्याणकारी योजना

विविध पिकांच्या संकरीत वाण निर्मितीमुळे देशांत हरितक्रांतीचा पाया घातला गेला. यानंतरच्या काळातील पंचवार्षिक योजनांद्वारे शेती विकासावर विशेष भर देण्यात आला. कृषी विद्यापीठातील सुधारीत तंत्रज्ञान सर्वसामान्य शेतक्यांपर्यत पोचवण्यासाठी आखलेल्या पीक प्रात्यक्षीके, प्रक्षेत्र भेटी, कृषी तंत्रज्ञान प्रचारसभा, चर्चासत्रे, मेळावे, प्रदर्शने इत्यादी कार्यक्रमांच्या परिणामकारक अंमलबजावणीमुळे कृषी उत्पादनवाढीमध्यें मोलाची भर पडली. या मुळे आपण अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्ण झालो असलो तरी अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता हे कृषी विभागाचे एकमेव उद्दीष्ट नसून शेतक्यांना उपलब्ध संसाधनांचा परिपूर्ण वापर करून अधिकाधिक आर्थिक फायदा मिळवून देणे हे सुद्धा नितांत गरजेचे आहे. यासाठी व्यापारक्षम शेतीची कास धरावी लागेल. मुक्त आर्थिक व्यवस्था व जागतीक व्यापार व्यवस्थेचा फायदा करून घेण्याच्या दृष्टिने कृषी, फलोत्पादन व जलसंधारण क्षेत्रात कृषी उत्पादन वाढ, निर्यातवृध्दी व कृषि प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या अनेकविध योजना कृषी विभागामार्फत राबविण्यांत येत आहेत.

शेती व्यवसायातून स्वयंपूर्णते बरोबरच आर्थिक उन्नती साधणे व जागतीक शेतमालाच्या बाजारपेठेत महत्वाचे स्थान मिळविणे या निर्धाराने कृषी विभागाची वाटचाल सुरु आहे. महाराष्ट्र शासन राबवत असलेल्या महत्वाकांक्षी योजना हा या धोरणाचाच भाग आहेत. आधुनिक कृषीतंत्राच्या वापरासाठी शेतकरी हा केंद्रबिंदू मानून आवश्यक त्या सर्व संसाधनांचा योग्य वापर करण्याच्या दृष्टिने मार्गदर्शन करणारी एकच यंत्रणा असावी यादृष्टिने कृषि विभागाची रचना करण्यांत आलेली आहे. त्या द्वारे कृषी तंत्रज्ञान थेट शेतक-यांपर्यत पोहोचविणे सुलभ झाले आहे.

केंद्र व राज्य शासन कृषी क्षेत्रातील विकासासंदर्भात विविध योजना राबावत आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतक्यांचे शेती उत्पादन वाढण्यासाठी, पिकांचे संरक्षण आणि त्यांची जोपासना करण्यासाठी, पिकांवरील आलेली कीड नियंत्रण करण्यासाठीचे कार्यक्रम आणि,राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत व्यापारी पिकांसाठी असलेल्या योजना यांचा यामध्ये समावेश आहे. सिंचनाच्या चांगल्या सोयी उपलब्ध झाल्यामुळे शेती आणखी फायद्यात आणणे ही येणा्या काळासाठी तितकेच गरजेचे आहे. हा संपूर्ण विचार करता त्यासाठी जिल्ह्यातील कृषी विभागामार्फत अनेक कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहे.

**पंतप्रधान पीक विमा योजना**

केंद्र शासनाने सुरु केलेली पंतप्रधान पीक विमा योजना शेतक-यांसाठी अत्यंत उपयुक्त आणि फलदायी असून या योजनेत सहभागी होण्यासाठी शेतक-याने फक्त १ रुपया भरून आपले नाव नोंद करायचे आहे. विमा हप्त्याची रक्कम ही केंद्र शासन भरणार आहे. शेतक-याने आपल्या आधार कार्डची प्रत, ७/१२ उतारा, बँक पासबूक झेरॉक्स, पीक पेरणी स्वयंघोषणा पत्र घेऊन आपल्या जिल्हातील किंवा आपल्या तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन नाव नोंदणी करावी हे सर्व केल्यानंतर त्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.अवकाळी झालेली अतिवृष्टी अथवा इतर नैसर्गिक आपत्तीमळे जमीन नापेर राहिल्यास त्या क्षेत्रालाही विमा संरक्षण मिळण्याची तरतूद या योजनेत करण्यात आली आहे.

**अन्न आणि पोषण सुरक्षा :** अन्नधान्य पिके (पूर्वीचे NFSM) (भात, कडधान्य, भरडधान्य (मका), पौष्टिक तृणधान्य व



TRFA कडधान्य ) या योजनेंतर्गत भात, कडधान्य, भरडधान्य (मका) व पौष्टिक तृणधान्य (ज्वारी, बाजरी, नागली, इ. पिकांची पीक प्रात्याक्षिके राबविली जातात अन्नधान्य पीक क्षेत्र विस्तार व उत्पादकतेमध्ये वाढ करून शेतक्यांच्या उत्पादनात शाश्वत वाढ करणे, जमिनीची सुपीकता व उत्पादन क्षमता वाढविणे, शेतक-यांचा आर्थिक स्तर उंचावणे. हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

**कृषी यांत्रिकीकरण**

शेतक-यांना कृषी यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देणे, पीक रचनेनुसार गरजेनुरूप व मागणी प्रमाणे पूर्वतपासणी केलेली दर्जेदार कृषीऔजारे शेतक-यांना अनुदानावर उपलब्ध करून देणे. व कृषी उत्पादन प्रक्रियेत अद्ययावत यंत्रसामुग्रीच्या वापरासाठी प्रोत्साहीत करणे. हे प्रमुख उद्देश साध्य करण्यासाठी जिल्ह्यामध्ये कृषी यांत्रिकीकरण योजना राबविण्यात येत आहे ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि ट्रॅक्टर सोबत चालणारी औजारे, ठिबक आणि तुषार सिंचन सेट, शेडनेट, पॉली हाऊस, कांदाचाळ,प्लास्टिक मल्चिंग इत्यादी गोष्टींसाठी अनुदानाचा लाभ घेण्यासाठी शेतक्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्यास त्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. महाडीबीटी पोर्टल- https://mahadbt.maharashtra.gov.in

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना.**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी या योजनेंतर्गत , गांडूळ खत युनिट, बांबू लागवड,फळबाग लागवड,नाडेप कंपोस्ट युनिट बनवणे, इतर लाभ दिले जातात.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रम योजनेतंर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक शेतजमीनीवर फळबाग लागवड करता येते.

**भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना**

शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ करणे, पीक रचनेत बदल घडवून आणणे व प्रक्रीया उद्योगांसाठी आवश्यक कच्च्या मालाच्या उत्पादनात वाढ करणे हे प्रमुख उद्देश साध्य करण्यासाठी १०० टक्के अनुदानावर भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना राबविण्यात येत आहे. जे शेतकरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रमाचा लाभ घेऊ शकत नाहीत असे शेतकरी जास्तीत जास्त ६ हेक्टर क्षेत्र मर्यादेत या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

**पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप)**

सोयाबीन, कापूस, हरभरा, भात, मका, ज्वारी व ऊस या महत्वांच्या प्रमुख पिकांवर वारंवार तसेच आकस्मिकरीत्या उद्‌भवणा-या कीड रोगांच्या प्रादुर्भावामुळे होणारे शेतक-यांचे नुकसान व त्यामुळे उत्पादनात होणारी घट लक्षात घेता यासाठी कीड व रोग सर्वेक्षण, सल्ला, जन जागृती व व्यवस्थापन याबाबतची शाश्वत यंत्रणा तयार करण्याच्या दृष्टीने पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (CROPSAP) राबविण्यात येत आहे. . शेतक-यांमध्ये कीड व रोगांची ओळख निर्माण करणे, त्यांना प्रशिक्षित करून कीड रोगांचे वेळीच व्यवस्थापन करणे, कीड रोगांच्या प्रादूर्भावाबाबत जागरूकता निर्माण करणे व पुढील संभाव्य नुकसान टाळून उत्पादनात वाढ करणे. पिकांचे सर्वेक्षण करून हंगाम निहाय प्रमुख कीड रोगांच्या प्रादुर्भावाबाबत शेतकरी यांचेमध्ये जाणीव निर्माण करणे व त्यांना वेळीच उपाययोजना सुचविणेसाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. शेतकरी हा केंद्रबिंदू मानून शेतक-यांसाठी कृषी विभागामार्फत ऊस सुपर केन नर्सरी प्रात्याक्षिके, हुमणी नियंत्रणासाठी प्रकाश सापळे उभारणी, बीज प्रक्रिया प्रात्याक्षिके, फलोत्पादन यांत्रिकीकरण, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना प्रती थेंब अधिक पीक, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्प उभारणी, केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकी करण उप अभियान, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- अन्नधान्य पिके, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान क्षेत्र विस्तार , सामूहिक शेततळे (राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत), कांदाचाळ उभारणी, आत्मनिर्भर भारत पॅकेजअंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन योजना (PMFME), कृषि पायाभूत सुविधा योजना, शेतकरी मासिक, महा-डीबीटी, राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान अंतर्गत- मृद आरोग्य पत्रिका योजना प्रशिक्षणासह प्रात्यक्षिक कार्यक्रम, परंपरागत कृषी विकास योजना (सेंद्रिय शेती), डॉ. पंजाबराव देशमख जैविक शेती मिशन, राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान (NMSA) अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) परंपरागत कृषी विकास योजना (सेंद्रिय शेती), जमीन आरोग्य पत्रिका कार्यक्रम, कृषी विभागामार्फत दिले जाणारे विविध कृषी पुरस्कार (राज्य पुरस्कृत योजना) अशा विविध योजना व उपक्रम जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहेत. कृषी विभागाच्या योजनांचा जास्तीत जास्त शेतक-यांनी लाभ घ्यावा, योजनांबाबत अधिक माहितीसाठी स्थानिक पातळीवरील कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे संपर्क साधावा.

जिल्हा माहिती कार्यालय,
सातारा

## विविध शासकीय योजनांचा जिल्हाधिका-यांकडून आढावा

### वृक्ष लागवड, लेक लाडकी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश



नांदेड दि. १४ : जूनमध्ये होणारी वृक्ष लागवड, लेक लाडकी योजनेतील लाभार्थ्यांची वृद्धी, शासनाच्या बांबू मिशनची अंमलबजावणी आणि लोकशाही दिनानिमित्त दाखल झालेल्या प्रलंबित तक्रारींचा तसेच जिल्हा व राज्यस्तरावरील प्रलंबित प्रकरणांचा आढावा आज जिल्हाधिकारी कार्यालयातील उच्चस्तरीय बैठकीमध्ये घेण्यात आला.

निवडणुका झाल्यानंतर शासन जोमाने कामाला लागले असून खरीपाच्या संदर्भातील कृषी विभागाच्या अनेक बैठका जिल्हाधिका्यांनी घेतल्या आहेत. यासोबतच जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी बी -बियाणे, खते कीटकनाशके यांची उपलब्धता व त्या संदर्भातील आढावा तालुका स्तरावर जाऊन घेण्यात आला आहे. त्यानंतर शासन स्तरावरील काही महत्त्वाच्या योजनांचा आढावा आजच्या बैठकीमध्ये घेण्यात आला.

आजच्या बैठकीला जिल्हाधिकारी अभिजीत राऊत ,निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, मनपा अतिरिक्त आयुक्त गिरिश कदम यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

आजच्या बैठकीत प्रामुख्याने महाराष्ट्र शासन बांबू मिशन आढावा, विद्यापीठ मार्फत चालणा्या इंटर्नशिप योजनेचा आढावा, लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणांचा आढावा, लेक लाडकी योजनेच्या प्रचार प्रसिद्धी आढावा याशिवाय अन्य सर्व बाबीचा आढावा घेण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सूचना करताना राज्य शासनाच्या सूचनेनुसार यावर्षी मोठया प्रमाणात जिल्ह्यामध्ये बांबू लागवड करण्यात यावी, ५० कोटी वृक्ष लागवड मोहिमेप्रमाणे उदिष्ठ्ये घेऊन बांबू लागवड करण्यात यावी,खासगी शाळांनी यामध्ये पुढाकार घ्यावा, गायराणावर प्रत्येक गावात ही लागवड व्हावी, कृषी विभागाने यासाठी पुढाकार घ्यावा, तसेच सर्व विभागाने यावर्षी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ठ पूर्ण करावे,असे निर्देश दिले. याशिवाय जिल्ह्यातील जनतेने देखील मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी यासाठी जनजागृती करण्याच्या आवाहनही त्यांनी केले.

लेक लाडकी योजनेचा आढावा यावेळी घेण्यात आला. सध्या जिल्ह्यात १८२७ लाभार्थी आहे. मात्र या योजनेतून पात्र असणा्या सर्वांना या योजनेचा लाभ मिळावा, अशी सूचना त्यांनी यावेळी केली. यासोबतच महिला सबळीकरण धोरणाच्या १६ कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याची सूचना जिल्हाधिका्यांनी केली.

विद्यापीठ मार्फत चालणा्या इंटर्नशिप योजनेचा आढावा घेण्यात आला. इंटर्नशिपसाठी विभागानी विद्यापीठाला आपल्या स्तरावर कळविण्याचे निर्देश या वेळी त्यांनी दिले.

लोकशाही दिनातील प्रलंबित सर्व प्रकरणे तातडीने पूर्ण करण्याची सूचना यावेळी करण्यात आली. अनेक विभागाकडे मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित आहे. निवडणूक काळात प्रलंबित राहिलेल्या प्रकरणाना तातडीने पूर्ण करण्यात यावे, अशी सूचना त्यांनी यावेळी दिली.

जिल्हा नियोजन अधिकारी श्री. आडे यानी यावेळी जिल्हा नियोजन समितीच्या संदर्भात आढावा घेतला. बैठक केव्हाही लागू शकते त्यामुळे सर्वानी आपले प्रस्ताव तयार ठेवावे, अशी सूचना करण्यात आली. याशिवाय राज्य, जिल्हा स्तरावरील समन्वयाच्या प्रश्नांवर या बैठकीत चर्चा झाली.

**प्रत्येक कुटुंबाने लावावे एक झाड**

दिवसेंदिवस पर्यावरणाचे असंतुलन वाढत आहे. तापमान वाढत आहे. जिल्ह्यातल्या प्रत्येक कुटुंबाने किमान एक झाड यावर्षी लावावे, असे आवाहन जिल्हाधिका-यांनी केले. सुरक्षित जागी या पावसाळ्यात आपले झाड लावले जाईल यासाठी कुटुंबातल्या प्रत्येकाने पुढे येण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

Mahindra
**सेल्समन पाहिजेत**

जगामध्ये व भारतामध्ये नंबर १ असलेल्या **महिंद्रा अँड महिंद्रा** कंपनीच्या ट्रॅक्टर विक्रीसाठी माहूर व किनवट तालुक्यासाठी विक्री प्रतिनिधी पाहिजे. योग्य उमेदवारास आकर्षक पगार व इन्सेंटिव्ह देण्यात येईल.
पात्रता : किमान बारावी पास, बीएस्सी अॅग्री किंवा अनुभवी सेल्समॅन यांना प्राधान्य देण्यात येईल.
*नोट : माहूर तालुक्यासाठी वाई येथील व किनवट तालुक्यासाठी सारखणी, उमरी, मांडवी येथील उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.*
मुलाखतीचे स्थळ : **महिंद्रा ट्रॅक्टर शोरूम, हॉटेल आदित्यच्या बाजूला, किनवट गोकुंदा रोड किनवट.**
मुलाखत : दि. 16/06/2024 वारः रविवार
वेळ : दुपारी 12 ते 3
संपर्क : 7030957466, 9881399555

**टी.सी.हरवली आहे**

**अजय मारोती पाटील यांची** सरस्वती अध्यापक महाविद्यालय किनवट येथील बी.एड्. पास ची टी.सी. किनवट ते माहुर बस प्रवासात हरवली आहे.
कृपया कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.
पत्ता : समतानगर, किनवट जि.नांदेड मो. 9373967467

**टी.सी.हरवली आहे**

**प्रतिक्षा गणपत मुनेश्वर या** नावाची एस.पी.एम.गिलानी कॉलेज घाटंजी येथून घेतलेली बी.कॉम. ची टी.सी. घाटंजी ते किनवट बस प्रवासात हरवली आहे.
कृपया कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.
पत्ता : सिध्दार्थनगर, गोकुंदा ता.किनवट मो. 9011593426

## ज्येष्ठ मंत्र्यांची खाती कायम ११ मंत्र्यांवर सोपविली पुन्हा तीच जबाबदारी

# केंद्रीय मंत्रिमंडळाचे खाते वाटप जाहीर

**नवी दिल्ली, १० : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील तिस-या कार्यकाळासाठीच्या मंत्रिमंडळाची खाते वाटपाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये ३० केंद्रीय मंत्री, पाच राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि २० राज्यमंत्री यांना खातेवाटप जाहीर झाले आहे. यामध्ये दोन केंद्रीय मंत्री, एक राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) व तीन राज्यमंत्री महाराष्ट्राला मिळाले असून यामुळे राज्याच्या विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे.**

महाराष्ट्रातील नितीन गडकरी यांच्याकडे रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री पदाचा, पियुष गोयल यांच्याकडे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पदाचा, प्रतापराव जाधव यांच्याकडे आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयातील राज्यमंत्री, रामदास आठवले यांच्याकडे सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री पदाचा कार्यभार , रक्षा खडसे यांच्याकडे क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री पदाचा कार्यभार तर मुरलीधर मोहोळ यांच्याकडे सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे.

**संपूर्ण मंत्रिमंडळाची यादी**

**केंद्रीय कॅबिनेट मंत्री :**

राजनाथ सिंह - संरक्षण मंत्रालय
अमित शाह - गृह मंत्रालय



अश्विनी वैष्णव - रेल्वे, माहिती आणि प्रसारण मंत्रालय
एस. जयशंकर - परराष्ट्र मंत्रालय
नितीन गडकरी - परिवहन आणि रस्ते विकास मंत्रालय
शिवराज सिंह चौहान - कृषी, पंचायत आणि ग्रामीण विकास मंत्रालय
मनोहर लाल खट्टर - ऊर्जा, शहरी विकास मंत्रालय
सीआर पाटील - जलशक्ती मंत्रालय
मनसुख मांडविया - कामगार मंत्रालय
जेपी नड्डा - आरोग्य, रसायन आणि खते मंत्रालय
ललन सिंह - पंचायत राज आणि मत्स्य उत्पादन मंत्रालय
डॉ. विरेंद्र कुमार - सामाजिक न्याय आणि अधिकारीता मंत्रालय
चिराग पासवान - क्रीडा मंत्रालय
किरेन रिजिजू - संसदीय कार्य मंत्रालय
अन्नपूर्णा देवी - महिला आणि बाल विकास मंत्रालय
राम मोहन नायडू - नागरी उड्डाण मंत्रालय
सर्वानंद सोनोवाल - जहाज बांधणी मंत्रालय
ज्युवेअल राम - आदिवासी कार्य मंत्रालय
किशन रेड्डी - कोळसा आणि खणन मंत्रालय
निर्मला सीतारामण - अर्थ मंत्रालय
जीतन राम मांझी - सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय
धर्मेंद्र प्रधान- शिक्षण मंत्रालय
एचडी कुमार स्वामी- अवजड उद्योग मंत्रालय
ज्योतिरादित्य सिंधिया - टेलिकॉम मंत्रालय
भूपेंद्र यादव - पर्यावरण मंत्रालय
प्रल्हाद जोशी -ग्राहक संरक्षण मंत्रालय
गजेंद्र शेखावत - कला, पर्यटन, सांस्कृतिक मंत्रालय
पीयूष गोयल - वाणिज्य मंत्रालय
हरदीप सिंह पुरी - पेट्रोलियम मंत्रालय
गिरीराज सिंह - वस्त्रोद्योग मंत्रालय

स्वतंत्र प्रभार राज्यमंत्री :

इंदरजित सिंग राव सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन, नियोजन मंत्रालय
जितेंद्र सिंह - विज्ञान आणि तंत्रज्ञान, पृथ्वी विज्ञान, पीएमओ कार्यालय, अॅटोमिक एनर्जी आणि अंतराळ विभाग
अर्जुन मेघवाल - विधी आणि न्याय, संसदीय कार्य मंत्रालय
प्रतापराव जाधव - आयुष, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय
जयंत चौधरी - कौशल्य, शिक्षण मंत्रालय, राज्यमंत्री :

जतीन प्रसाद- वाणिज्य आणि उद्योग, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, श्रीपाद नाईक - ऊर्जा मंत्रालयट , पंकज चौधरी - अर्थ मंत्रालय, कृष्णा पाल - सहकार मंत्रालय , रामदास आठवले - सामाजिक न्याय आणि अधिकारीता मंत्रालय रामनाथ ठाकूर - कृषी आणि शेतकरी विकास मंत्रालय, नित्यानंद राय - गृह मंत्रालय, अनप्रिया पटेल - आरोग्य आणि कुटुंब विकास, रसायन आणि खते मंत्रालय, व्ही. सोमण्णा - जलशक्ती आणि रेल्वे मंत्रालय, डॉ. चंद्रशेखर पेमासानी - ग्रामीण विकास आणि दळणवळण मंत्रालय, एसपी बघोल- मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय तसेच पंचायत राज मंत्रालय, शोभा करंदलाजे - सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग, कामगार आणि रोजगार मंत्रालय, बीएल वर्मा - ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालय, अजय टमटा - परिवहन आणि रस्ते मंत्रालय, हर्ष मल्होत्रा -परिवहन आणि रस्ते मंत्रालय
शांतनू ठाकूर -जहाज बांधणी मंत्रालय, रवनीत बिट्टू - अल्पसंख्याक मंत्रालय, सुरेश गोपी - कला, पर्यटन, सांस्कृतिक मंत्रालय, रक्षा खडसे - क्रीडा आणि युवक कल्याण मंत्रालय
मुरलीधर मोहोळ - सहकार आणि नागरी उड्डाण मंत्रालय.

# विकास कामासाठी आलेला निधी अखर्चिक ठेवल्याने सरपंच व ग्रामसेवकाला कारणे दाखवा नोटीस

लोकादेश न्यूज, किनवट, ता.१३ : तालुक्यातील बोधडी खुर्द ग्रामपंचायतीअंतर्गत विकास कामांसाठी शासनाकडून प्राप्त झालेल्या १.३५ कोटी रुपयांचा विकास निधीपैकी केवळ २६.३ टक्के रक्कम खर्च करून बाकीची रक्कम नियोजित वेळेत विकास कामावर खर्च न केल्याबद्दल तेथील सरपंच व ग्रामसेवकाविरुद्ध पं.स.चे गटविकासअधिकारी पुरुषोत्तम वैष्णव यांनी दि.०७ जून रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

या नोटीसमध्ये म्हटले आहे की, सन २०२० ते २०२४ या कालावधीतील आर्थिक वर्षात शासनाकडून बोधडी खु. ग्रामपंचायतीला ०१ कोटी ३५ लाख १५ हजार १२९ रुपये प्राप्त झालेले होते. ई-ग्राम स्वराज्य प्रणालीनुसार त्यापैकी केवळ ३५ लाख ५२ हजार २११ रुपये ग्रामविकासासाठी खर्च केले असून, तब्बल ९७ लाख ६२ हजार ०१८ रुपये अखर्चिक ठेवले आहेत. १५ व्या वित्त आयोगान्वये अनुज्ञेय असणा-या स्वच्छता, पाणी पुरवठा व इतर भौतिक सुविधा आदी विकास कामापासून बोधडी खु. गावाला आपण वंचित ठेवले आहात. ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. तसेच आपणाकडून अद्यापपर्यंत ग्रा.पं.चा १५ वा वित्त आयोग आर्थिक, भौतिक अहवाल व इतर अहवाल अद्ययावत स्वरूपात प्राप्त झालेला नाही. त्यामुळे ही नोटीस मिळताच पुढील तीन दिवसाच्या आत या सर्व बाबींचा लेखी खुलासा समक्ष येऊन सादर करावा. आपला खुलासा विहित मुदतीत सादर न झाल्यास आपले म्हणणे काहीच नाही असे गृहित धरून ग्रा.पं.अधिनियम १९५८ चे कलम ३९ अन्वये सरपंचांविरुद्ध कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. तसेच संबधित ग्रामसेवक यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा शिस्त व अपील नियम १९६४ मधील नियमानुसार विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यात येईल याची गांभिर्याने नोंद घ्यावी, अशी ताकीद देण्यात आली आहे.

सदर कारणे दाखवा नोटीस देऊन तीन दिवस उलटले असून, संबंधित सरपंच व ग्रामसेवकांनी शासनाकडून निधी प्राप्त होऊन सुद्धा गत चार वर्षात बोधडी खु.च्या ग्रामस्थांना भौतिक सुविधा का पुरविल्या नाहीत. गावाला मूलभूत सुविधा न देता अविकसित ठेवण्यामागे त्यांची उदासीनता होती की इतर कोणता हेतू होता? याबाबत ते काय खुलासा करणार आहेत, हे जाणून घेण्याची उत्सुकता तेथील नागरिकांमध्ये आहे. तसेच तालुक्यात १३४ ग्रामपंचायती असून, त्यातील किती ग्रा.पं.नी असाच कित्ता गिरविला आहे, हेही या निमित्ताने समोर येणे गरजेचे झाले आहे. किनवट तालुक्यातील अनेक गावे पेसाअंतर्गत येत असून, कोट्यावधी रुपयांचा निधी शासन विकास कामासाठी दरवर्षी देत असते. मात्र ग्रा.पं.चे सरपंच व ग्रामसेवकांच्या अशा उदासीन धोरणांमुळे अनेक गावचा निधी परत जात असतो; पर्यायाने गावविकासाला खीळ बसते, हे या निमित्ताने उघडकीस आले आहे.

# शैक्षणिक वर्षारंभ प्रसंगी सर्व शाळांमध्ये प्रवेशोत्सव साजरा करावा



लोकादेश न्यूज, किनवट : सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षी विद्यार्थ्यांना शाळेत येण्यास प्रत्यक्षात शनिवारी (दि.१५ जून) व विदर्भातील विद्यार्थ्यांना शाळेत येण्यास प्रत्यक्षात दिनांक ०१/०७/२०२४ रोजी प्रारंभ होणार आहे. विद्यार्थ्यांना शाळेची ओढ व आस्था निर्माण व्हावी यासाठी शाळा सुरु होण्याच्या प्रथम दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत प्रभावी तसेच उत्सुकतेने होणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर सत्र २०२४-२५ मध्ये इयत्ता १ ली ते १२ वी मधील सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेशोत्सवाच्या प्रसंगी स्वागत करावे, असे राज्याचे शिक्षण संचालक (प्राथमिक) नंदकुमार बेडसे यांनी पत्राद्वारे कळविले असल्याचे गट शिक्षणाधिकारी ज्ञानोबा बने यांनी सांगितले.

त्याअनुषंगाने पुढील प्रमाणे मुख्याध्यापकांनी कार्यवाही करावी : शाळेच्या परिसरातील (वयोगट ६ ते १४ वर्ष) वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांचे शाळेत प्रवेश झाले असल्याची खात्री करण्यात यावी. शाळाबाह्य झालेली किंवा असलेल्या बालकांचा शोध शाळापूर्व तयारीच्या कालावधी मध्ये करण्यात यावा. निदर्शनास आल्यास अशा बालकांना शाळेत प्रवेश देण्यात यावेत. नजीकच्या परिसरातील दगडखाणी, वीटभट्टी, बांधकामाचे स्थळ, उद्याने बाजारपेठा, पदपथ, सिग्नल, कुटीर उद्योग, कामगार वस्त्या या सारख्या ठिकाणांचे सर्वेक्षण करण्यात यावे. शाळा प्रवेशाच्या पहिल्या दिवशी शिक्षण विभागातील प्रत्येक अधिकाऱ्यांनी व्यक्तिशः किमान एका शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचे/शिक्षकांचे मनोबल उंचावण्यासाठी उद्बोधन/प्रबोधन करावे. विद्यार्थ्यांचे स्वागत फुल किंवा अन्य शालेय उपयोगी साहित्य, स्थानिक स्रोत मध्ये उपलब्ध उपयोगी सामुग्री देऊन करण्यात यावे. सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या किमान पातळीपर्यंत आणण्याबाबत शाळा व्यवस्थापन समिती, सदस्य, पालक व शिक्षक यांचेशी विचार विमर्श करून अध्ययन निष्पत्ती साठी उपाय योजना, सेतू अभ्यासक्रम, इतर विविध शैक्षणिक साधनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत उद्बोधन व सहकार्य करावे. शाळा प्रवेशोत्सावाच्या कार्यक्रमाची स्थानिक पातळीवरील प्रसार माध्यमाद्वारे व्यापक प्रसिद्धी करण्यात यावी. शाळा प्रवेशाच्या दिवशी माजी विद्यार्थ्यांचे, माजी शिक्षक, स्थानिक पदाधिकारी, ग्रामस्थ इत्यादी यांचे सहकार्य घेण्यात यावे. शाळा सुरु होण्याच्या दिवशी शिक्षकांनी वेळेवर उपस्थित राहून प्रभातफेरी आयोजन, विद्यार्थ्यांचे फुल देऊन स्वागत, मोफत पुस्तक वितरण, मोफत गणवेश इत्यादी कार्यक्रम आयोजित करावेत. यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था तसेच स्थानिक सेवाभावी संस्था (युवक मंडळे, क्रीडा मंडळे, ज्येष्ठ नागरिक संघ) यांचे सहकार्य घ्यावे. दिनांक १५ जून, २०२४ रोजी राज्यात शाळा प्रारंभ होत आहेत. हा प्रारंभ चैतन्यमय आणि उत्साहवर्धक झाल्यास शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक वाटचालीसाठी गती मिळते ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन राज्यात शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आयोजित करावा. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेमधून या दिवशी मिष्ठान्न भोजन द्यावे.

# किनवटमध्ये चोरीच्या घटनेत ३.२५ लाखांचा ऐवज लंपास

**लोकादेश न्यूज, किनवट : शहरात एक घर व एक दुचाकी शोरूम फोडून अज्ञात चोरट्यांनी रोख रकमेसह ३ लाख २९ हजार ७० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना गुरुवारी दि.१३ सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.**



किनवट येथील डॉ.सुनील इंदलसिंग राठोड हे शहराच्या सरस्वती विद्या मंदिर परिसरातील महेश माडपेल्लीवार यांच्या घरात भाड्याने राहातात. डॉ.राठोड हे बुधवारी दि.१२ घराला कुलूप लावून कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. या संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी बुधवारी रात्री १ ते गुरुवारी पहाटे ४ च्यादरम्यान त्यांच्या घराचे कुलूप तोडून कपाटातील रोख ४० हजार रुपयासह १ लाख ५ हजार रु.किमतीची ३५ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत, १० ग्रॅम वजनाच्या ३० हजार रु.किमतीच्या २ बांगड्या, ५ ग्रॅम सोन्याच्या १५ हजार रु.किमतीच्या अंगठ्या, २९ हजार रुपयाची ५० तोळे चांदी, २० तोळे चांदीच्या लक्ष्मीच्या मुर्ती असा एकूण १ लाख १९ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला.गुरुवारी सकाळी गावाहून परतलेल्या डॉ.सुनील राठोड यांना घरफोडीची घटना निदर्शनास आल्यानंतर त्यांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध पोलिसांत तक्रार दिली. अन्य एका घटनेत किनवट पालिकेचे माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार यांच्या मालकीचे अशोकस्तंभ परिसरातील हिरो शोरूम अज्ञात चोरट्यांनी बुधवारी रात्री फोडले. गुरुवारी सकाळी कर्मचारी शोरूम उघडण्यासाठी आले असता,त्यांना शोरूमचे शटर व चॅनलगेट अज्ञातांनी तोडल्याचे निदर्शनास आले.चोरट्यांनी शोरूमच्या कॅश काउंटरचे लॉक तोडून आतील सामान अस्ताव्यस्त फेकले.कॅश काउंटरमधील रोख ४० हजार, २ ग्रॅम सोन्याची १० हजार रु.किमतीची लक्ष्मीची मुर्ती, १० हजाराची चिल्लर रोकड, ८ हजार रु.किमतीचा सॅमसंग मोबाईल व ५ हजार रु.किमतीचा सीसीटीव्ही डीव्हीआर असा एकूण ७३ हजाराचा मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणी शोरूमचे व्यवस्थापक सागर ओद्दीवार यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल केला.

# रामस्वरुप मडावी यांच्या यांच्या 'काहूर' काव्यसंग्रहास सावित्रीबाई फुले साहित्यभूषण राज्यस्तरीय पुरस्कार

**लोकादेश न्यूज, किनवट : येथील साहित्यिक कवी रामस्वरूप मडावी यांच्या 'काहूर' काव्यसंग्रहास अखिल भारतीय मराठी साहित्य चळवळीचे मुख्यकेंद्र, मराठी साहित्य मंडळ ठाणे यांच्या वतीने दिला जाणारा साहित्य क्षेत्रातील 'सावित्रीबाई फुले साहित्य भूषण राज्यस्तरीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला.**



ठाणे येथील मराठी ग्रंथ संग्रहालय येथे मराठी साहित्य मंडळाच्या वतीने नुकत्याच आयोजित २० व्या राज्यस्तरीय कविसंमेलनात त्यांना कार्यक्रमाचे उद्घाटक तथा ठाणे शहर विधानसभा मतदार संघाचे आमदार संजय केळकर यांचे हस्ते हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष तथा ज्येष्ठ लेखक सिध्देश्वर कोळी (उस्मानाबाद) हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जयप्रकाश घुमटकर उर्फ कवी गोलघुमट हे स्वागताध्यक्ष होते.नौपाडा विभागाच्या माजी नगरसेविका प्रतिभाताई राजेश मढवी ह्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. शाल, सन्मानचिन्ह व मानदपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

या प्रसंगी झालेल्या राज्यस्तरीय कविसंमेलनात राज्यातील प्रसिद्ध साहित्यिक कवी यांनी हजेरी लावली होती. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जयप्रकाश घुमटकर यांच्या प्रेरणेतून, आयोजकठाणे जिल्हा उपाध्यक्षा प्रणिता देवरे आणि ठाणे जिल्हाउपाध्यक्ष डॉ. राजेंद्र कवडे यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला.

कवी रामस्वरूप मडावी यांना हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल येथील साहित्य क्षेत्रातील उत्तम कानिंदे, रमेश मुनेश्वर, मुख्याध्यापक मोहन जाधव, रुपेश मुनेश्वर, सुर्यभान खंदारे, किशन धुर्वे, देविदास वंजारे, प्रदीप कुडमेथे, सुरेश पाटील, राजेश पाटील व मित्र परिवार यांनी त्यांचे कौतुक केले.

# वनविभागाच्या पथकाने कारसह ४६ हजाराचा मुद्देमाल केला जप्त





लोकादेश न्यूज, किनवट : गस्तीवार असलेल्या वनविभागाच्या पथकाला पाहून लाकूड तस्कराने कार सोडून पलायन केले. संशयावरून त्याच पांढ्या रंगाची टाटा इंडिका कारची झडती घेतल्यानंतर त्यात साडेचार हजारांचा कटसाईज सागी लाकूड आढळून आले. ४०,००० हजाराच्या कारसह ४६,६१६ रुपयाचा मुद्देमाल वनविभागाच्या हाती लागला. आज (१५ जून) दुपारी गोकुंद्रातील ईदगाह रोड दरम्यान ही कारवाई करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितलेवन विभागाचे पथक कर्तव्यावर असतांना पथकाला बघुन गोकुंदातील ईदगाह रोडवर टाटा इंडिका कार सोडून लाकूड तस्करासह चालकाने पळ काढला, पथकाच्यालक्षात आल्यानंतर त्या गाडीची तपासणी केली असता त्यात अवैधसागी कटसाईज २१ नग ज्याची किंमत ४.६१६ रुपयाचे लाकूड आढळून आले. शिवाय ४०,००० हजाराची कारही पथकाने जप्त करन आशात आरोपीविरुद्ध वनगुन्ह्याची नोंद करण्यात आली. नांदेडचे उपवनसंरक्षक केशव वाबळे, सहाय्यक वनसंरक्षक जीडी. गिरी, वनपरिक्षेत्र अधिकारी पी. एल.राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली चिखलीचे वनपरिमंडळ अधिकारी एम.एन. कतुलवार, वनपाल एस.एम. कोम्पलवार, वनपाल एस.एम. यादव, वनरक्षक अनिल फोले, बी.एस. झंपलवाड, ओ.एन. शिंदे, व्ही एस. मुळे तसेच वाहन चालक बाळकृष्ण आवले व शेख नूर यांचा या कार्यवाहीत सहभाग असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# महाकवी वामनदादा कर्डकांना स्मृतिदिनानिमित्त वाहीली स्वरांची आदरांजली

**लोकादेश न्यूज, किनवट : आदीजन संस्था संचलित वामनदादा कर्डक संगीत अकादमीच्या वतीने राजर्षी शाहूनगर गोकुंदा येथील सम्राट अशोक बुद्ध विहार येथे महामानवासह देशभक्ती, कष्टकरी, निसर्ग, पर्यावरण, स्त्रीप्रधान, प्रेमकाव्य, विडंबन गीते, चित्रपट गीते लिहिणारे कवी, संगीतकार वामनदादा कर्डक यांच्या २० व्या स्मृतिदिनानिमित्त स्वरांची आंदराजली वाहून अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.**



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बंडू भाटशंकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.आनंद भालेराव, वसंत सर्पे, मनोहर साळवे उपस्थित होते. तबला विशारद प्रा. शिवकुमार कोंडे, राहुल तामगाडगे यांच्या हस्ते भ.बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, वामनदादा कर्डक यांच्या प्रतिमापूजनानंतर वंदना घेण्यात आली. उपस्थित विद्यार्थी व रसिकांना संगीत अलंकार, राग रागिणी, सुर, ताल, लय इ. माहिती संचालक सुरेश पाटील, प्रा शिवकुमार कोंडे यांनी दिली. आर्यन मुजमुले, स्पर्शिका पाटील, आयुष्या मुजमुले, कामराज माडपेल्लीवार, कवी रमेश मुनेश्वर (राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक), प्रा.डॉ. आनंद भालेराव, सुनंदा पाटील, भाग्यवान खोब्रगडे, दीपाली गिमेकर, मनीषा साळवे यांनी प्रबोधन गीते सादर केली. महाकवि वामनदादा कर्डक यांच्या 'भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते....' हे संदेश गीत सादर करून सुरेश पाटील यांनी आदरांजली वाहिली.

कार्यक्रमास उत्तम कानिंदे, रमाकांत गायकवाड, मुकूंद मुनेश्वर, चंद्रशेखर सर्पे, आनंद गिमेकर, सुषमा पाटील, पुष्पलता गायकवाड, सुनिता पाटील, उषा मुजमुले, दीपाली रामटेके, अनिकेत रामटेके, प्रतिक भाटशंकर, सुनिल इंगोले उपस्थित होते.

# 'खरीप विमा काढण्यासाठी नावातील दुरूस्ती करून घ्या'

लोकादेश न्यूज, किनवट, ता.१५: खरीप विमा भरतेवेळी शेतकरी बांधवांना नवीन नियमानुसार आधार कार्ड, पासबुक व सातबारावरील नाव एकसारखे नसल्यास खरीप विमा अप्रुव्हल होणार नसल्याची माहिती समोर आली असून, शेतक-यांना नावातील फरक लवकरात लवकर दुरुस्त करून घ्यावे लागणार आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शेतक-यांना सन २०२४ खरीप हंगामातील पिकांचा विमा काढताना नवीन नियमानुसार आधार कार्ड, पासबुक तसेच सातबारावर असलेले नाव सारखेच असावे लागणार आहे, उदाहरणार्थ जसे राम - रामराव, बाळू - बालासाहेब, ज्ञानेश्वर-ज्ञानदेव, प्रभू-प्रभाकर, सरुबाई-सरस्वती, चंपाबाई चंफाबाई, महादू -महादेव, रौफ-रऊफ, कासिम-काशिम, बाबू - बाबूसाब असा फरक असेल, तर दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच काहींच्या साताबारावर आडनाव नाहीत. त्यांनी आडनाव टाकून घेणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे आधार कार्ड, पासबुक व सातबारावर स्वतःचे नाव किंवा वडीलांचे नाव किंवा आडनावामध्ये असे थोडेफार बदल असतील तर आताच त्यांनी आपले नाव दुरुस्त करून घेणे आवश्यक आहे. कारण या सर्वांमध्ये जर सारखा डाटा असेल तरच विम्यामध्ये फॉर्म अप्रुव्हल होणार आहेत, अन्यथा फॉर्म रिजेक्ट होतील. त्यानंतर विमा भरणारा दुकानदार किंवा विमा तालुका प्रतिनिधी काहीही करू शकणार नाहीत. त्यामुळे ज्या शेतक-यांच्या आधार,बँकपासबुक व सातबारातील नावात सारखेपणा नसेल , त्यांनी विनाविलंब दुरुस्त करून घ्यावे. असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# हिंदू भक्तांवरील भ्याड हल्ल्याचा विहिंप तर्फे निषेध



**लोकादेश न्यूज, किनवट, ता.११ : जम्मू-काश्मीरमधील रियासी जिल्ह्यात शिवखोडी या गुफातीर्थस्थळाचे दर्शन घेऊन परतत असलेल्या भाविकांच्या बसवर रविवारी (दि.०९) सकाळी संशयित अतिरेक्यांनी केलेल्या गोळीबारात १० भक्तांचा मृत्यू तर ३३ जण जखमी झाले होते. या घटनेचा तीव्र संताप व निषेध येथील विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, दुर्गा वाहिणी, मातृशक्ती, सकल हिंदु समाज किनवट तर्फे करण्यात येऊन, या संदर्भातील एक निवेदन येथील सहाय्यक जिल्हाधिकारी मार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठविण्यात आले.**

निवेदनात म्हटले की, निष्पाप भाविकांवर असा अमानुष हल्ला करणा-या या पाशवी हल्लेखोरांचा व हे षड्यंत्र वा कटकारस्थान रचणा-या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांची सखोल चौकशी करावी व दोषींना कठोर शासन देण्यात यावे. तसेच यापुढे वैष्णौदेवी यात्रा भाविक भक्तांना सुखकर निर्भयतेने करता यावी, यासाठी योग्य त्या उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात अशी विनंतीवजा मागणी करण्यात आली आहे. सदर निवेदनावर विहिंपचे जिल्हा मंत्री संतोष रायेवार, प्रखंड मंत्री रविकांत कंतुलवार, शहर मंत्री जयंत मच्छर्लावार, व्यंकट भातनासे, शिवराज चाडावार, प्रशांत कुलकर्णी, विशाल पांपटवार, चंद्रकांत नेम्मानीवार, रमेशचंद्र दारमवार,रोहित चाडावार, किरण ठाकरे, सौ.सुनिता भंडारे, शिवकुमार भंडारे, सतीश बिराजदार, कृष्णा कलकुंटलावार आदीच्या स्वाक्ष-या आहेत.

# बाजेचा गात डोक्यात मारून पत्नीचा खून

लोकादेश न्यूज, किनवट : क्षुल्लक कारणाहून पेटलेल्या भांडणात बाजेचा गात डोक्यावर मारून पत्निचा खून केल्याची घटना दि. १० जून रोजी सायंकाळी बोधडी येथे घडली. या घटनेनंतर आरोपी पती फरार झाला आहे. मुळचे राज्यस्थानचे असलेले रहिवाशी कैलास डांबर हे त्यांची पत्नी अर्चना व सावत्र मुलगा चंद्रकात यांना सोबत घेवून काम करण्यासाठी बोधडी (बु.) येथे आले होते. सध्या ते शेळके गल्लीत राहात होते. दि. १० जून रोजी बोधडी येथील आठवडी बाजार होता. सायं. ७.३० च्या दरम्यान अर्चना डांबर ही बाजार करून घरी परतली. तेवढयात पती कैलास काम करून घरी आला. या दोघांमध्ये शुल्लक कारणावरून भांडण सुरू झाले. यावेळी इयत्ता ७ वीत शिकत असलेला सावत्र मुलगा चंद्रकात घरीच होता. भांडण विकोपाला जाताच पती कैलासने बाजेचा गात पत्न ी अर्चनाच्या डोक्यात घातला. तेंव्हा ती रक्त भंबाळ झाली. मुलगा रडत बाहेर आल्याने शेजारी जमा झाले. तेव्हा आरोपी कैलास डांबरने तेथुन पळ काढला. शेजाऱ्यांनी अर्चना यांना गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे आणले असता डॉक्टरांनी तिला मृत घोषीत केले. . चंद्रकांत उमेश ठाकूर (वय वर्ष १४) या मुलाच्या फिर्यादीवरून किनवट



पोलीसांनी गुर १५२/२४, ३०२ गुन्ह्याची नोंद केली. हत्यारा कैलाशने हत्या करून पोबारा केला आहे.

# एकत्रित लढू अन् सत्ताबदल करू

**महाविकास आघाडीच्या तीनही पक्षांनी व्यक्त केला निर्धार; स्वबळाच्या चर्चेला पूर्णविराम**




**मुंबई : लोकसभा निकालाची पुनरावृत्ती विधानसभा निवडणुकीत निश्चितपणे होईल आणि राज्यात सत्ताबदल अटळ असल्याचा ठाम विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि काँग्रेस नेते, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी शनिवारी व्यक्त केला. मोठा भाऊ, छोटा भाऊ, असा वाद टाळून निवडून येण्याची क्षमता या आधारे जागावटप करण्याचा निर्धारही करण्यात आला.**

या वेळी काँग्रेसचे विधिमंजळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शिवसेना नेते संजय राऊत आणि आदित्य ठाकरे आदी उपस्थित होते. लोकसभेपेक्षा अधिक ताकदीने लढून विधानसभेत लोकसभेपेक्षा चांगले यश संपादन करू, असा दावा पृथ्वीराज चव्हाण यांनी केला. शेतक्यांसह सर्वच समाज घटकांनी लोकसभा निवडणुकीत भाजपला धडा शिकविला आहे. धार्मिक ध्रुवीकरणाचा भाजपचा प्रयत्न यशस्वी होऊ शकला नाही, असे मतही चव्हाण यांनी व्यक्त केले. लोकसभेत सर्वाधिक १३ खासदार काँग्रेसचे निवडून आले असले तरी विधानसभेच्या जागावाटपात मोठा भाऊ, छोटा भाऊ असा वाद आम्ही घालणार नाही, असेही चव्हाण यांनी स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'रोड शो' झाला त्या घाटकोपरमध्ये राष्ट्रवादीच्या उमेदवाराला मताधिक्य मिळाले. मोदीच्या राज्यात जेथे जेथे जाहीर सभा झाल्या तेथे महायुतीचा पराभव झाला याकडे राष्ट्रवादीचे पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी लक्ष वेधले. भाजपकडून सत्तेचा दुरुपयोग करण्यात आला. शेतकरी वर्ग भाजपच्या धोरणांवर नाराज होता. शेतक्यांच्या नाराजीचा भाजपला फटका बसला आहे. कांद्याने भाजपला रडविले, असेही पवार म्हणाले.

मुंबई व राज्यात 'एम' घटकामुळे शिवसेना ठाकरे गटाला यश मिळाल्याच्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आरोपांचा समाचार घेताना उद्धव ठाकरे म्हणाले, 'एम' म्हणजे मराठीबरोबरच आम्हाला हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चनांसह सर्व भाषकांची मते मिळाली आहेत. लोकशाही वाचविण्याकरिता सर्वधर्मीय व भाषकांनी महाविकास आघाडीला भरभरून मते दिली. हजारो लोकाच्या रक्तातून मिळालेली मुंबई भाजपला लुटू देणार नाही, असा इशाराही ठाकरे यांनी दिला. कांद्याने भाजपला रडविले, असे बोलले जाते. पण कांद्यामुळे की मित्रपक्षांमुळे भाजपच्या डोळ्यात पाणी आले, असा सवाल करीत ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना टोला लगाविला. देशात जातनिहाय जनगणना झाली पाहिजे या मागणीचा शरद पवार यांनी पुनरुच्चार केला.

**तुमचे खरे कथानक होते का?**

'आम्ही खोटे कथानक रचून निवडून आलो, असा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपची अन्य मंडळी नैराश्यातून करीत आहेत. इंडिया आघाडी सत्तेत आल्यास मंगळसूत्र काढून नेतील, तुमची संपत्ती जास्त मुले होणाऱ्यांना वाटतील, नकली सेना, प्रत्येकाला नोकरी व घर देणार, उद्योगधंदे येतील हे तुमचे खरे कथानक होले का, असा सवाल शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून शनिवारी केला.

**भाजप अजिंक्य नाही उद्धव ठाकरे**

लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजप अजिंक्य पक्ष असल्याचे चित्र उभे केले गेले. पण अजिंक्य असल्याचा भाजपचा फोलपणा उघड झाला. भाजपला राज्यात अपयश आले पण देशातही बहुमत मिळू शकले नाही.

देशात मोदी किंवा भाजप सरकार नव्हे तर आता राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेत असल्याचे ठाकरे यांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मिळालेल्या यशाने लढाई संपलेली नाही तर खरी लढाई आता सुरू झाली आहे

लोकसभेप्रमाणेच राज्यातील जनता विधानसभा निवडणुकीत भाजप आणि महायुतीला जबरदस्त दणका देईल, असा दावा ठाकरे यांनी केला. भाजपकडून सत्तेचा दुरुपयोग करण्यात आला. शेतकरी वर्ग भाजपच्या धोरणांवर नाराज होता. शेतक्यांच्या नाराजीचा भाजपला फटका बसला आहे. कांद्याने भाजपला रडविले.

# निधीची तरतूद वक्फ मंडळाच्या बळकटीकरणासाठी

## २००७ मध्ये वक्फ़विषयक संयुक्त संसदीय समितीच्या सूचनेनुसार तत्कालीन राज्य शासनाचा निर्णय

मुंबई, दि. १४ : केंद्र शासनाच्या वक्फ़ विषयक संयुक्त संसदीय समितीने २००७ मध्ये राज्याला भेट दिली असता तत्कालीन राज्य शासनाने वक्फ़ मंडळाच्या बळकटीकरणासाठी अनुदान देण्याबाबत आश्वासन दिले होते. त्यास अनुसरून तत्कालीन राज्य शासनाने या मंडळाच्या बळकटीकरणासाठी अनुदान देण्याची योजना २०११ पासून सुरू केलेली आहे. या योजनेनुसार अल्पसंख्यांक विकास विभागाद्वारे वक्फ़ मंडळाच्या बळकटीकरणासाठी दरवर्षी मागणीप्रमाणे निधी अर्थसंकल्पीत केला जातो. यावर्षी देखील १० कोटींच्या तरतुदीपैकी २ कोटी निधी हा मागणीप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना वितरित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाद्वारे देशात वक्फ़ कायदा १९९५ लागू करण्यात आलेला या कायद्यातील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. वक्फ़ मंडळ हे वैधानिक मंडळ असून राज्यातील वक्फ़ मालमत्ता संबंधित कामकाजाचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी वक्फ़ मंडळावर आहे. ज्याप्रमाणे राज्यांमधील धर्मादाय संस्थांचे संनियंत्रण धर्मादाय आयुक्त कार्यालयाद्वारे करण्यात येते, त्याचप्रमाणे राज्यातील वक्फ़ संस्थांचे सनियंत्रण राज्य वक्फ़ मंडळामार्फत करण्यात येते. वक्फ़ मालमत्ता या दान स्वरूपात दिलेल्या मालमत्ता असून सदर मालमत्तांच्या उत्पन्नातून गोरगरीब, गरजू लोकांच्या आयुष्यामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याची जबाबदारी वक्फ़ मंडळाची आहे. लाभार्थ्यांमध्ये मुस्लिमेत्तर लोकांचा देखील समावेश असतो. तथापि वक्फ़ मंडळाचे प्रशासन अधिक सक्षम व बळकट व्हावे यासाठी राज्य शासनाद्वारे २०११ पासून उपरोक्त योजना सुरू केलेली आहे.

राज्यात अल्पसंख्याक विकास विभाग कार्यरत असून अल्पसंख्याक नागरिकांना उच्च शिक्षण देणे, त्यांना रोजगारांच्या संधी, कौशल्य विकास, विविध व्यवसायासाठी अर्थसहाय्य देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न विभागाद्वारे कायम सुरू असतात. त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकार निर्णय घेत असतात.

# प्रचारादरम्यान मर्यादांचे उल्लंघन, आता समस्या सोडवा : सरसंघचालक मणिपूरकडे लक्ष द्या



**नागपूर : निवडणूक ही लोकशाहीतील नियमित प्रक्रिया आहे. त्यात स्पर्धा असली तरी मर्यादा आवश्यक असते. निवडणूक प्रचारादरम्यान मर्यादांचे उल्लंघन झाले. आता निवडणूक संपली असून सर्वच पक्षांनी देशातील समस्या सोडविण्याचा विचार करावा, या शब्दांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी नागपुरातून सर्वच राजकीय पक्ष व नेत्यांचे कान टोचले. संघाच्या कार्यकर्ता विकास वर्ग-द्वितीयच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.**

या कार्यक्रमाला छत्रपती संभाजीनगरच्या श्री क्षेत्र गोदावरी धामचे पीठाधीश महंत रामगिरीजी महाराज, वर्गाचे सर्वाधिकारी इक्बालसिंग, प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार, महानगर संघचालक राजेश लोया प्रामुख्याने उपस्थित होते.

**मणिपूरमध्ये त्राही त्राही**

मणिपूर एका वर्षापासून पेटतो आहे. जुने गनकल्चर बंद झाले असे वाटत होते. मात्र द्वेषाचे वातावरण निर्माण केल्याने मणिपूरमध्ये त्राही त्राही झाली आहे. आता तरी त्या स्थितीचा विचार व्हायला हवा, असे भागवत यांनी सुनावले.

# दीड टक्के मत वाढवा: विधानसभा आपलीच देवेंद्र फडणवीसांनी दिला विश्वास; 'त्या' लोकांवर कारवाई : बावणकुळे



मुंबई : लोकसभा निवडणुकीत अपयश आले, याचा अर्थ विधानसभा गेली, असा कोणीही काढू नका लोकसभेतील आकडेवारीच सांगते की, केवळ दीड-दोन टक्के मते वाढविली की, आपला विजय नक्की आहे, त्यादृष्टीने कामाला लागा, असे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चे यांनी शुक्रवारी भाजपचे पदाधिकारी, आमदार, खासदार, पराभूत उमेदवार यांना दिले. तर, लोकसभेत पक्षविरोधी कारवाया करणा-यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केले. लोकसभेतील पराभवानंतर भाजपच्या चार बैठका शुक्रवारी येथे झाल्या. यावेळी फडणवीस म्हणाले, लोकसभेच्या ३१ जागा महाविकास आघाडीने जिंकल्या याचा अर्थ विधानसभेच्या १८६ जागांवर ते पुढे आहेत, असा अजिबात नाही. जवळपास ३० विधानसभा मतदारसंघांमध्ये आपण फक्त ३ ते ५ हजारांनी मागे आहोत. हार पचविण्याची सवय तुटल्याने नैराश्य आले, पण ते झटकून कामाला लागा. बैठकीस विनोद तावडे, शिवप्रकाश, राज्यातील मंत्री, नेते उपस्थित होते.

**उपमुख्यमंत्रिपद सोडण्याचे संकेत**

सरकारच्या बाहेर राहूनच पक्षकार्य करता येते, असे म्हणत फडणवीस यांनी यावेळी उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याचा विचार मागे घेतलेला नसल्याचे स्पष्ट केले.

**आपला लढा फेक नरेटिव्हविरोधात**

१. लोकसभा निवडणुकीत आपल्याबाबत बुद्धिभेद (फेक नरेटिव्ह) करण्यात आला. त्याचा फटका आपल्याला बसला.

२. आता प्रत्येक कार्यकर्त्याला भाजपविरोधातील नरेटिव्ह आला रे आला की, त्याचे जोरदार प्रत्युत्तर देण्याची मुभा आहे, असे फडणवीस यांनी जाहीर केले. प्रत्युत्तर देताना ते अंगलट येणार नाही एवढीच काळजी घ्या, असा सल्लाही देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिला.

# प्रलंबित, तडजोडपात्र प्रकरणासाठी २९ जुलै ते ३ ऑगस्ट २०२४ पर्यंत विशेष लोकअदालत सप्ताह

मुंबई, दि. १३ :- लोकअदालतीव्दारे पक्षकारांना जलद गतीने मिळणारा दिलासा लक्षात घेता सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्याकडे प्रलंबित असलेली तडजोडपात्र प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्यासाठी विशेष लोकअदालत सप्ताहाचे आयोजन केले आहे. ही विशेष लोकअदालत दिनांक २९ जुलै २०२४ ते ३ ऑगस्ट २०२४ या दरम्यान होणार आहे.

लोक अदालतीमध्ये तडजोडीव्दारे निकाली निघालेल्या प्रकरणांमुळे प्रकरणातील पक्षकारांसोबत शासन आणि समाज या दोन्ही घटकांना मोठा लाभ प्राप्त झाला आहे. लोकअदालतीमुळे न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्यामध्ये मोठया प्रमाणात यश प्राप्त झाले आहे. न्यायालयातील तडजोड पात्र प्रलंबित प्रकरणे आपसी सामंजस्यातून तडजोडीव्दारे निकाली काढण्याकरिता लोकअदालत हे प्रभावी माध्यम म्हणून समोर आलेले आहे. यामुळे विशेष लोकअदालती मार्फत सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली तडजोडपात्र प्रकरणे लोकअदालतीच्या माध्यमातून निकाली काढण्यात येणार आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने लोकअदालतमध्ये ठेवलेल्या प्रकरणांची यादी https://legalservices.maharashtra.gov.in/Site/Upload/Pdf/MAHARASHTRA.pdf या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी ज्यांची प्रकरणे या यादीमध्ये असतील त्यांनी स्वतः अथवा वकीलांमार्फत महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई किंवा संबंधीत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधून याचा लाभ पक्षकारांनी घ्यावा, असे आवाहन सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांनी केले आहे.

संपर्कासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे संपर्क क्रमांक (कंसात) पुढीलप्रमाणे : अकोला (८५९१९०३९३०), बीड (८५९१९०३६२३), चंद्रपूर (८५९१९०३९३४), गोंदिया (८५९१९०३९३५), कोल्हापूर (८५९१९०३६०९), नांदेड (८५९१९०३६२६), उस्मानाबाद (८५९१९०३६२५), रायगड (८५९१९०३६०६), सातारा (८५९१९०३६११), ठाणे (८५९१९०३६०४), यवतमाळ (८५९१९०३६२९), अहमदनगर (८५९१९०३६१६), अमरावती (८५९१९०३६२७), भंडारा (८५९१९०३९३६), धुळे (८५९१९०३६१८), जळगाव (८५९१९०३६१९), लातूर (८५९१९०३६२४), नंदूरबार (८५९१९०३६३९३९), परभणी (८५९१९०३६२२), रत्नागिरी (८५९१९०३६०८), सोलापूर (८५९१९०३६१३), वर्धा (८५९१९०३९३२), मुंबई (८५९१९०३६०१), औरंगाबाद (८५९१९०३६२०), बुलढाणा (८५९१९०३६२८), गडचिरोली (८५९१९०३९३३), जालना (८५९१९०३६२१), नागपूर (८५९१९०३९३१), नाशिक (८५९१९०३६१५), पुणे (८५९१९०३६१२), सांगली (८५९१९०३६१०), सिंधुदूर्ग (८५९१९०३६०७), वाशिम (८५९१९०३६३९३७) आणि मुंबई उपनगर (८५९१९०३६०२).

**सर्वोच्च न्यायालयात प्रकरणे प्रलंबित आहेत का? सुप्रीम कोर्टाच्या विशेष लोक अदालतीत सहभागी व्हा**

नांदेड दि. १३ :- नवी दिल्ली येथे सर्वोच्च न्यायालयात अनेक वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या खटल्यांना निकाली काढण्याची एक संधी नांदेड जिल्ह्यातील नागरिकांना मिळत आहे. सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली येथे २९ जुलै ते ३० ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, त्याचा लाभ घेण्याचे आवाहन विधी विभागाने केले आहे.

**तडजोडीची तयारी हवी**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेडच्या सचिवांकडून प्रसिद्धी देण्यात आलेल्या पत्रकात या संदर्भातील आवाहन करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयात २९ ते ३० ऑगस्ट या दरम्यान ही विशेष लोक अदालत होत आहे. या लोक अदालतीमध्ये सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली जाणार आहेत. जिल्ह्यातील ज्या पक्षकारांची प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. आणि ही प्रकरणे तडजोडीने मिटविण्याची ज्यांची इच्छा आहे, अशाच प्रकरणाचा या ठिकाणी निपटारा होणार आहे.

**ऑनलाईन सहभागही शक्य**

या लोक अदालतीमध्ये पक्षकार प्रत्यक्ष किंवा आभासी पद्धतीने (ऑनलाईन) सहभागी होऊ शकतात. नांदेड जिल्ह्यातील प्रकरणे सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष लोक अदालती मध्ये ठेवण्यासाठी संबंधित वकिलांना कल्पना देणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील ज्या पक्षकारांना किंवा ज्यांच्या केसेस पेंडिंग आहेत अशा नागरिकांना या संदर्भात अधिक माहिती व मदत हवी असल्यास नांदेड येथील जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिवांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांनी तालुका विधी सेवा समिती यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्षा नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सुरेखा कोसमकर व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती दलजीत कौर जज यांनी केले आहे.

**वेळ व पैशाची बचत**

नागरिकांनी २९ जुलै ते ३० ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या या लोकदालतीचा लाभ घ्यावा, यामुळे साध्या सोप्या पद्धतीने वाद मिटवता येतो. झालेल्या तडजोडीचा निवाडा अंतिम अंमलबजावणी होऊ शकणारा असतो. तसेच यामध्ये वेळेची व पैशाची बचत होते. तडजोड झाल्यास न्यायालयीन शुल्क परत मिळते. त्यामुळे या लोक अदालतीचा लाभ घेण्याचे आवाहन विधी सेवा प्राधिकरणाने केले आहे.

# युवाशक्ती करीअर शिबीराच्या माध्यमातून युवकयुवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध

**आमदारांची कार्यक्रमाला उपस्थिती**

**युवाशक्ती करीअर शिबिरात ८०० युवक-युवतींचा सहभाग**

**युवक- युवतीनी करिअर शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन**




**नांदेड दि. १५ :- दहावी, बारावीनंतर विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी या विषयावर शासनाच्या माध्यमातून छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करीअर शिबिर संकल्पना राबविण्यात येत आहे. या युवाशक्ती करीअर शिबिराच्या माध्यमातून युवक-युवतींना रोजगाराच्या संधी व मार्गदर्शन मिळेल, या संधीचा युवक-युवतीनी लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार बालाजी कल्याणकर व आमदार आमदार मोहनराव हंबर्डे यांनी केले.**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे आयोजन आज कामगार कल्याण मंडळाचे ललीतकला भवन लेबर कॉलनी येथे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते दोघे उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मंबई , शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदेड यांच्यावतीने आयोजित छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे उदघाटन आज आमदार बालाजी कल्याणकर, आमदार मोहनराव हंबर्डे यांच्या हस्ते झाले. यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्था व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कैलास राठी , उद्योजक अरूण फाजगे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी आर. बी. गणवीर , रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या सहाय्यक आयुक्त रेणूका तम्मलवार, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एस.व्ही. सुर्यवंशी, उद्योजक अरुण फाजगे आदीची उपस्थिती होती.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून आयोजित शिबिरातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी व मार्गदर्शन मिळून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होण्यास मदत होईल. या युवाशक्ती करीअर शिबिराचा युवक-युवतीनी लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार मोहनराव हंबर्डे यांनी केले. तसेच त्यांनी या मेळाव्यात उपस्थित युवक- युवकांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातून ८०० युवक व युवतींनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी व उज्वल भविष्यासाठी प्रा. सारिका बकवाड यांनी मार्गदर्शन केले. इयत्ता १० व १२ वी नंतरच्या संधी याबाबत संजय सारडा यांनी मार्गदर्शन केले. सुहास राऊत यांनी शैक्षणिक कर्ज व स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय योजना याबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी उर्त्स्फूत प्रतिसाद दिला. यावेळी विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन करण्यात आले. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सचिन सुर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रस्तावना जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी आर.बी. गणवीर यांनी केले. करीअर मार्गदर्शन संबंधी विविध महामंडळामार्फत प्रदर्शन भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे उपप्राचार्य कंदलवाड व्ही.डी. यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राका यांनी केले.

# 'नीट'च्या १,५६३ उमेदवारांचे ग्रेस गुण रद्द, फेरपरीक्षा होणार

**केंद्र सरकारची सर्वोच्च न्यायालयात माहिती; २३ जून रोजी फेरचाचणी**

**पुन्हा परीक्षा न दिल्यास ग्रेस गुण वगळून मूळ गुणांच्या आधारे निकाल**




**नवी दिल्ली : एमबीबीएस, बीडीएस आणि इतर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या नीट-यूजी परीक्षेतील १,५६३ उमेदवारांना सवलतीचे (ग्रेस) गुण देण्याचा निर्णय रद्द करण्यात आला आहे. या उमेदवारांना २३ जून रोजी पुन्हा चाचणी देण्याचा पर्याय दिला जाईल. यापैकी जे उमेदवार फेरचाचणी देणार नाहीत त्यांचे ग्रेस गुण वगळून मूळ गुणांच्या आधारे निकाल दिला जाईल, अशी माहिती केंद्र सरकारने गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात दिली.**

नीट-युजी परीक्षेतील पेपरफुटी आणि इतर गैरप्रकारांमुळे ही परीक्षा रद्द करण्यासह ग्रेस गुणांच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात अलख पांडे यांनी दाखल केलेल्या याचिकेसह विविध याचिका दाखल झाल्या होत्या. त्यावर न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या सुटीतील खंडपीठापुढे सुनावणी झाली. दोन दिवसांपूर्वी खंडपीठाने ही परीक्षा रद्द करणार नसल्याचे स्पष्ट करत प्रवेशासाठीच्या समुपदेशन प्रक्रियेला स्थगिती देणार नसल्याचे म्हटले होते, तसेच केंद्र सरकार व एनटीएला उत्तर देण्याचे आदेश दिले. त्यानुसार गुरुवारी केंद्राच्या वकिलांनी आपली बाजू मांडली. नीट परीक्षेतील १,५६३ उमेदवारांना ग्रेस गुण देण्याचा निर्णय रद्द करीत आहोत.

गैरप्रकार उघड करणारे अलख पांडे कोण आहेत?

१. नीट परीक्षेतील गैरव्यवहार आणि १५६३ उमेदवारांना ग्रेस गुण देण्याविरोधात लढा अलख प्रकरण फिजिक्सवाला या नामवंत कोचिंग क्लासेसचे संस्थापक आहेत. २०२० मध्ये पांडे यांनी किफायतशीर दरात विद्यार्थ्यांना जेईई-नीट परीक्षेचे मार्गदर्शन करण्यासाठी फिजिक्सवाला कोचिंगची स्थापना केली.

साप्ताहिक लोकादेशचे मालक, प्रकाशक, संपादक **साजीदोद्दीन शरफोद्दीन बडगुजर** यांनी मुद्रक **शेख राजीक शेख खाजामिया** यांच्या हिंदूस्थान ऑफसेट प्रिंटींग प्रेस, हनुमान मंदिर जवळ किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे मुद्रित करून बडगुजर भवन मोमीनपुरा, किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR/2007/20732 फोन/फॅक्स नं. (02469) 221666 भ्रमणध्वनी : 09850900628 ईमेल : sajidbadgujar@gmail.com, lokadesh@gmail.com